RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक १०८] शुक्रवार, डिसेंबर ३, २०२१/अग्रहायण १२, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २०८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

दुसरा मजला, मंत्रालय (विस्तार इमारत), हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ डिसेंबर, २०२१

**अधिसूचना**

**वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९.**

क्रमांक वैमाशा २०२०/ प्र.क्र.१४५/ ग्रासं.३.—वैधमापन शास्त्र, अधिनियम २००९ ( २०१० चा क्र. १ ) च्या कलम ५३ च्या पोट-कलम (१) व (२) मधील खंड (ग) सह कलम २३ च्या पोट-कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंबधात महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून उक्त अधिनियमातील कलम ५३ च्या पोट-कलम (१) मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाशी पूर्वविचारविनिमय केल्यानंतर याद्वारे महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मध्ये महाराष्ट्र शासन खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. उक्त अधिनियमातील कलम ५३ च्या पोट कलम (४) नुसार सदरचे नियम यापूर्वी प्रसिध्द करण्यात आले होते :—

१. या नियमांना "महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) (पहिली सुधारणा) नियम, २०२१" असे म्हणण्यात येईल.

२. महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ (यापुढे " मुख्य नियम " असे संबोधण्यात येईल) मधील नियम ६ मध्ये–

(क) पोट-नियम (१) साठी समाविष्ट करण्यात येत असलेला पोटनियम खालीलप्रमाणे असेल—

"(१) वजन वा माप यांचा प्रत्येक उत्पादक किंवा दुरुस्तक किंवा विक्रेता आपणाला परवाना मिळावा म्हणून नियंत्रक यांनी विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात व पद्धतीत नियंत्रक यांचेकडे किंवा नियंत्रक यांनी प्राधिकृत केलेल्या वैधमापन शास्त्र अधिकाऱ्यांकडे ऑनलाईन अर्ज करेल ;

परंतु, दुरुस्तीसाठी, उत्पादकाने स्वतः निर्माण केलेल्या वजन वा मापाची दुरुस्ती करण्यासाठी त्याची निर्मिती करत असलेल्या राज्याव्यतिरीक्त इतर राज्यात दुरुस्ती करण्यासाठी उत्पादकास दुरुस्तीचा कोणताही परवाना घेण्याची आवश्यकता

असणार नाही, तथापि, उत्पादकाने, दुरुस्तीबाबत संबधित वैधमापन शास्त्र अधिकाऱ्यास आगाऊ कळविले पाहिजे ;

परंतु, आणखी असे की, एखादी व्यक्ती मालकीच्या किंवा तिच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही वजन वा मापाची खरीखुरी दुरुस्ती करीत असेल तर त्या व्यक्तीस या पोटनियमात नमूद केलेला परवाना घेण्याची आवश्यकता असणार नाही ;

परंतु, आणखी असेही की, नियंत्रकाने विनिर्दिष्ट केलेली तांत्रिक समर्थता चाचणी उमेदवार उत्तीर्ण झाल्याशिवाय त्यास कोणताही परवाना देण्यात येणार नाही ;

(ख) पोट-नियम (२) ऐवजी, समाविष्ट करण्यात येत असलेला पोट-नियम खालीलप्रमाणे असेल—

" (२) वजन वा माप यांचा प्रत्येक उत्पादक किंवा दुरुस्तक किंवा विक्रेता परवान्याची विधीग्राह्यता समाप्त होण्याच्या किमान ३० दिवस आधी परवान्याच्या स्वयं नुतनीकरणासाठी नियंत्रक यांचेकडे किंवा नियंत्रक यांनी प्राधिकृत केलेल्या वैधमापन शास्त्र अधिकाऱ्यांकडे ऑनलाईन अर्ज करेल ";

(छ) पोट-नियम (४) मधील " एक ते पाच कॅलेंडर वर्षाच्या कालावधीकरिता " या शब्दांऐवजी " दहा वर्षाच्या कालावधी-करिता " हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

(ज) पोट-नियम (५) मध्ये—

(७) पहिल्या परंतुकामध्ये, " दरवर्षी " या शब्दांऐवजी " पहिल्या वर्षाकरिता " हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत ;

(८) दुसऱ्या परंतुकामध्ये, " दरवर्षी " या शब्दांऐवजी " पहिल्या वर्षाकरिता " हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(९) दुसऱ्या परंतुकानंतर, खालील परंतुकाचा समावेश करण्यात येत आहे—

" परंतु, आणखी असे की, सर्व्हर किंवा पोर्टल मध्ये बिघाड किंवा नैसर्गिक आपत्ती अशा प्रकरणांमध्ये पहिल्या व दुसऱ्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये नियंत्रक यांना वाढ करता येईल ";

(च) पोट-नियम (६) मधील, " किंवा परवान्याची नक्कल प्रत मिळण्यासाठी " हे शब्द वगळण्यात येत आहेत.

(छ) पोट-नियम (९) मधील, " किंवा साधनसामग्री अथवा हत्यारे इत्यादी " हे शब्द वगळण्यात येत आहेत.

३. मुख्य नियमातील नियम ११ ऐवजी खालील नियम समाविष्ट करण्यात येत आहे—

" ११: उत्पादकांनी अभिलेख ठेवणे, इत्यादी :— वजन वा माप यांचा प्रत्येक उत्पादक किंवा दुरुस्तक किंवा विक्रेता, नियंत्रक यांनी विहीत केलेल्या नमुन्यात ऑनलाईन अभिलेख ठेवेल. तसेच नियंत्रक यांनी विहीत केलेल्या नमुन्यात नियतकालीक अहवाल ऑनलाईन सादर करेल.".

४. मुख्य नियमातील नियम १४ मधील पोट-नियम (४) वगळण्यात येत आहे.

५. मुख्य नियमास जोडण्यात आलेली अनुसूची-दोन (क) वगळण्यात येत आहे.

६. मुख्य नियमास जोडण्यात आलेली अनुसूची-दोन (ख) वगळण्यात येत आहे.

७. मुख्य नियमास जोडण्यात आलेल्या अनुसूची-४ मधील (एक), (दोन) आणि (तीन) या नोंदीऐवजी खालील नोंदी समाविष्ट करण्यात येत आहेत :—

| | | |
|---|---|---|
| " (एक) उत्पादक | : | रुपये ८०००/- प्रति वर्षी |
| (दोन) दुरुस्तक | : | रुपये ३०००/- प्रति वर्षी |
| (तीन) विक्रेता | : | रुपये १५००/- प्रति वर्षी " |

८. मुख्य नियमास जोडण्यात आलेल्या अनुसूची ५ ऐवजी खालील अनुसूची समाविष्ट करण्यात येत आहे :—

**“अनुसूची - पाच**

[पहा नियम ६(६)]

वजन वा माप यांचे उत्पादक किंवा दुरुस्तक किंवा विक्रेता यांच्या परवान्यामध्ये फेरफार करणेकरिता द्यावे लागणारे शुल्क : रुपये ५००/- प्रति परवाना”.

९. मुख्य नियमास जोडण्यात आलेली अनुसूची - आठ वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**चारूशीला तांबेकर,**
शासनाच्या सहसचिव.

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai, 400 032, dated the 3rd December, 2021

### *NOTIFICATION*

LEGAL METROLOGY ACT, 2009.

No. LM-2020/ CR 145 / C.P.3.– In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clause (*c*) of sub-section (*2*) of section 53 read with sub-section (*2*) of section 23 of the Legal Metrology Act, 2009 (1 of 2010), in its application to the State of Maharashtra and of all other powers enabling it in that behalf and after consultation with the Central Government as required by sub-section (*1*) of section 53 of the said Act, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011, the same having been previously published as required by sub-section (*4*) of section 53 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Legal Metrology (Enforcement) (Amendment) Rules, 2021.

2. In rule 6 of the Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011 (hereinafter referred to as " the principal Rules "),—

(a) for sub-rule (*1*), the following sub-rule shall be substituted, namely :—

" (*1*) Every manufacturer or repairer of or dealer in, weight or measure shall make an online application for the issue of a license to the Controller or such Legal Metrology Officer, as may be authorized by him in this behalf, in the appropriate Form and procedure as may be specified by the Controller :

Provided that, no license to repair shall be required by a manufacturer to repair the weight or measure manufactured by him and used in other State, however, the manufacturer has to inform in advance to the concerned Legal Metrology Officer about the repairing :

Provided also that, a person who bonafide repairs any weight or measure owned or possessed by him shall not be required to obtain a license referred in this sub rule :

Provided further that, no license shall be issued unless the applicant has passed technical ability test as may be specified by the Controller " ;

(b) for sub-rule (*2*), the following sub-rule shall be substituted, namely ;

" (*2*) Every manufacturer or repairer of, or dealer in, weight or measure shall make an online application for auto renewal of license at least thirty days before the expiry of the validity of license to the Controller or such Legal Metrology Officer, as may be authorized by him in this behalf, in the appropriate Form and procedure as may be specified by the Controller. " ;

(c) in sub-rule (*4*), for the words " period not exceeding five calendar years ", the words " period not exceeding ten calendar years", shall be substituted ;

(d) in sub-rule (*5*),—

(*i*) in the first proviso, the words "per year" the words "for first year" shall be substituted ;

(*ii*) in the second proviso, for the words "per year" the words for "first year" shall be substituted ;

(*iii*) after the second proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided further that, in case of any server or portal issue or in case of natural calamity, the time- limit specified in the first and second proviso shall be extended by the Controller. " ;

(e) in sub-rule (*6*) the words "or for the issue of a duplicate license" shall be deleted ;

(f) in sub-rule (*9*) the words "or equipments or tools, etc." shall be deleted.

3. For rule 11 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"11. *Records to be maintained by manufacturers, etc.*– Every manufacturer or repairer of, or dealer in, weight or measure shall maintain records and registers online in the appropriate format as may be specified by the Controller and also submit such periodical reports online in the appropriate format as may be specified by the Controller.".

4. In rule 14 of the principal Rules, subrule (*4*) shall be deleted.

5. SCHEDULE – II-A appended to the principal Rules shall be deleted.

6. SCHEDULE- II-B appended to the principal Rules shall be deleted.

7. In SCHEDULE IV appended to the principal Rules, for entries (i) (ii) and (iii) the following entries shall be substituted, namely :—

"(*i*) Manufacturer : Rs. 8000 per year.

(*ii*) Repairer : Rs. 3000 per year.

(*iii*) Dealer : Rs. 1500 per year "

8. For SCHEDULE V appended to the principal Rules, the following Schedule shall be substituted, namely :—

" SCHEDULE V

[(*see* Rule 6(6)]

Fee for alteration in manufacturer or, repairer of, or dealer in weight or measure license : Rs. 500/- per license "

9. SCHEDULE VIII appended to the principal Rules shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHARUSHILA TAMBEKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.